असा. क्र. १९

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी २१, २०००/ माघ १, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**—महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने आणखी वाढविण्यासाठी अधिनियम. | ६१–६३ |


दिनांक २० जानेवारी २००० रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २१ जानेवारी २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने आणखी वाढविण्यासाठी अधिनियम.

१९९९ चा महा. अध्या. १९. **ज्याअर्थी**, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक २७ ऑगस्ट १९९९ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, १९९९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर उक्त अधिवेशनाची सत्र समाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर १९९९ रोजी झाल्यामुळे वेळेअभावी उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत प्रस्तुत करता आले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे, परिणामतः उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून ज्या तारखेस सहा आठवड्यांचा कालावधी संपता, त्या ३ डिसेंबर १९९९ या तारखेनंतर जारी असण्याचे बंद झाले ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी कायद्याद्वारे, जारी असण्याचे चालू ठेवण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे इष्ट होते असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू रहाण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती, आणि म्हणून, उक्त अध्यादेश मागे घेऊन त्याचे निरसन करण्यात आले होते आणि दिनांक २ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ दिनांक २७ ऑगस्ट १९९९ पासून भूतलक्षी प्रभावाने प्रख्यापित केला होता ; १९९९ चा महा. अध्या. ३५.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ यामधील मूळ तरतुदीच्या ऐवजी राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे नवीन तरतुदी दाखल करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— १९९९ चा महा. अध्या. ३५.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या ~~अध्यादेशास~~ अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे व पुढे चालू ठेवणे) ~~अध्यादेश,~~ अधिनियम १९९९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २७ ऑगस्ट १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ या महा. अधि. क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश '' मुख्य अधिनियम '' असा केला आहे) याचे कलम १ मधील पोट-कलम (४) मध्ये, '' १९९९ '' या आकड्यांऐवजी '' २००० '' हे आकडे दाखल करण्यात येतील. १९७१ चा महा. ४७.

व्यावृत्ती. ३. कोणत्याही व्यक्तीने, दिनांक १ जुलै १९९९ रोजी सुरू होणाऱ्या आणि २७ ऑगस्ट १९९९ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती ही, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध ठरली नसती तर, त्याबाबतीत ती व्यक्ती, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९९९ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे त्या दिनांकापासून दिनांक ३० जून २००० हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यात आल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झालेला नव्हता असे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे, सुधारण्यात व मुदत वाढविण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधिनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल. शंका दूर करणे.

१९९९ चा महा. अध्या. ३५. ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९९९ चा महा. अध्या. क्रमांक ३५ याचे निरसन करणे व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा केलेला कोणताही नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही, नियुक्ती, नियम, काढलेला आदेश किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई